MHRG060011602025

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | १३/१०/२०२५ |
| नोंदणी तारीख | : | १३/१०/२०२५ |
| निकाल तारीख | : | १२/०३/२०२६ |
| कालावधी | : | **वर्षे महिने दिवस** |
| | | ०० ०४ २७ |

**पेण येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात, ता. पेण, जि. रायगड.**

(पिठासीन अधिकारी – श्रीम. एस. के. टोनपे)

सीएनआर : एमएचआरजी ०६–००११६०–२०२५

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ७०४/२०२५**

**निशाणी क्र. ०६/क लगत**

| | |
|---|---|
| महाराष्ट्र राज्य<br>(द्वारा : निरीक्षक रा.उ.शुल्क अलिबाग विभाग)<br>गु.र. नं. ११६/२०२५ | )<br>)<br>)... **अभियोग पक्ष** |

विरुध्द

| | |
|---|---|
| **रुपेश दत्ता पाटील,**<br>वय ३७ वर्षे,<br>रा. गडब, ता. पेण, जि. रायगड. | )<br>)<br>).....**आरोपी** |

**महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम कलम ६५ (ई) अन्वये**

**विधीज्ञ :**

वि. सहाय्यक सरकारी अभियोक्ता ............... श्री. मोहम्मद इसराइल

आरोपीतर्फे वि. वकील ................ श्रीमती एस. एन. ठाकूर

**: न्यायनिर्णय :**

(घोषीत दिनांक १२ मार्च २०२६ रोजी)

आरोपीस महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम कलम ६५ (ई) अन्वये अपराधाकरीता संपरीक्षीत केले आहे.

०२. प्रस्तुत प्रकरणातील अभियोग पक्षाचे कथन, आरोपीचा बचाव, अभिलेखावर आलेला तोंडी व लेखी पुरावा तसेच आरोपीवर ठेवण्यात आलेल्या गुन्ह्याच्या तपशिलाचा विचार करता माझे समक्ष पुढील मुद्दे उपस्थित असून त्याचे निष्कर्ष मी त्यापुढे नोंदविण्यात आलेल्या कारणाकरीता नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे शाबीत केले का की, आरोपी हा दि. १५/०६/२०२५ रोजी १५.३० वाजण्याचे सुमारास त्याचे राहते घराच्या मागील बाजूस पडवीमध्ये गडब, ता. पेण, जि. रायगड येथे अवैधरित्या विनापरवाना बेकायदेशीररित्या ५०० मिली क्षमतेच्या ४८ प्लॅस्टिक पिशव्या गावठी हातभट्टी दारुने भरलेल्या त्यात अंदाजे २४ लि. गावठी हातभट्टी दारु जवळ बाळगून त्याची चोरटी विक्री करीत असताना मिळून आला ? | **...नकारार्थी** |
| २. | काय आदेश? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**का र ण मि मां सा**

**०३.** प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरूध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे एक पंच साक्षीदार नामे प्रमोद विठ्ठल म्हात्रे यांना तपासण्यात आले. मी दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

<u>**मुद्दा क्रमांक १ करिताः–**</u>

**०४.** महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम कलम ६५(ई) नुसार आरोपीला दोषी ठरविण्यासाठी अभियोग पक्षाने असे सिद्ध करणे आवश्यक आहे की, आरोपी हा दि. १५/०६/२०२५ रोजी १५.३० वाजण्याचे सुमारास त्याचे राहते घराच्या मागील बाजूस पडवीमध्ये गडब, ता. पेण, जि. रायगड येथे अवैधरित्या विनापरवाना बेकायदेशीररित्या ५०० मिली क्षमतेच्या ४८ प्लॅस्टिक पिशव्या गावठी हातभट्टी दारुने भरलेल्या त्यात अंदाजे २४ लि. गावठी हातभट्टी दारु जवळ बाळगून त्याची चोरटी विक्री करत असताना मिळून आला. आरोपीविरुध्द आरोप सिद्ध करण्यासाठी आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेला मुद्देमाल हा पंचनाम्यावरील साक्षीदार तपासून भारतीय साक्ष पुरावा कायदा, १८७२ प्रमाणे सिद्ध करणे आवश्यक आहे. तसेच जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हे मादक द्रव्य होते असे रासायनिक तज्ञांच्या अहवालावरुन सिद्ध करणे आवश्यक आहे.

**०५.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र. १ पंच प्रमोद विठ्ठल म्हात्रे यांनी अभियोग पक्षास सहाय्य केले नाही. साक्षीदारास उलटतपासादरम्यान विचारण्यात येतील असे प्रश्न विचारण्याची अभियोग पक्षाची विनंती मान्य करण्यात आली. परंतू त्यांच्या उलटतपासादरम्यानही अभियोग पक्ष ठोस असे काही अभिलेखावर आणण्यात अपयशी ठरला आहे.

०६. अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता, अभिलेखावर रासायनिक परिक्षणाचा अहवाल दाखल करण्यात आलेला नाही. प्रकरणातील पंच साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य केले नाही. प्रकरणामध्ये खबर, छापिल खबर सिद्ध झालेली नाही. प्रकरणातील पंचनामा तसेच मुद्देमाल पावती देखील सिद्ध झालेली नाही. प्रकरणातील फिर्यादी, कॅरिअर तसेच तपासी अंमलदार यांची साक्ष नोंदवलेली नाही. अभियोग पक्षातर्फे इतर साक्षीदारांना तपासण्यात अभियोग पक्षास अपयश आलेले आहे. उपरोक्त कारणमिमांसेचा विचार करता, गुन्हयात जप्त मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातून जप्त केला व तो मुद्देमाल दारुच होती असे शाबित होऊ शकत नाही. म्हणून मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता :-</u>**

०७. मुद्दा क्र. १ वरील नकारार्थी निष्कर्ष विचारात घेता, आरोपीचे ताब्यातून जप्त करण्यात आलेला मुद्देमाल दारु होती हे अभियोग पक्षाने रासायनिक तपासणी अहवाल दाखल न केल्याने सिद्ध झाले नाही. उपरोक्त बाबींचा विचार करता अभियोग पक्ष आरोपीने गुन्हा केल्याचे सिद्ध करु न शकल्यामुळे मिळणारा संशयाचा फायदा आरोपीस मिळतो. त्यामुळे आरोपी सदर गुन्हयातील आरोपातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र झाला आहे. सबब, मी मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१) आरोपी नामे **रुपेश दत्ता पाटील,** रा. गडब, ता. पेण, जि. रायगड यांस महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्याच्या आरोपातून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र रद्द करण्यात येत असून त्याच्या जामीनदारास त्याने दिलेल्या जामीनीतून मुक्त करण्यात येत आहे.

३) आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१ अन्वये रक्कम रुपये १५,०००/– वैयक्तिक बंधपत्र व त्याच रकमेचा एक जामीन द्यावा.

४) गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल अपिल कालावधी संपल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क, अलिबाग – रायगड यांचे संबंधित कार्यालयास पुढील कारवाईसाठी पाठविण्यात यावा.

खुल्या न्यायालयात घोषीत केले.

SANGITA KISANRAO TONPE
Digitally signed by SANGITA KISANRAO TONPE
Date: 2026.03.12 16:05:31 +0530

**स्थळः– पेण** **(एस. के. टोनपे)**
**दिनांकः– १२/०३/२०२६** **प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी, पेण.**